दैनिक आरंभ मराठी

www.arambhmarathi.com

■ कोल्हापूर ■ सांगली ■ सातारा ■ सोलापूर ■ धाराशिव ■ लातूर ■ वर्ष 3 रे ■ अंक 46 ■ गुरूवार, 7 मे 2026 ■ पाने 04 ■ किंमत रू.4 ■ epaper.arambhmarathi.com


**सुविचार**

पराभवाने कथा संपत नाही, तर नव्या अध्यायाची सुरुवात होते.


SS MOBILE®

धाराशिव जिल्ह्यात सर्वाधिक मोबाईल विक्री होणारे, विश्वसनीय ठिकाण.

(नवनवीन ऑफर जाणून घेण्यासाठी आजच संपर्क करा)

जिजाऊ चौक, बार्शी नाका, धाराशिव.

Mo.7841810075/8329723615


# अवकाळीने साडेतीन हजार शेतकऱ्यांचे 3.39 कोटींचे नुकसान

## मार्च महिन्यातील अवकाळी पावसाच्या नुकसानीचा अहवाल शासनाला सादर

आरंभ मराठी । धाराशिव

**धाराशिव जिल्ह्यात मार्च महिन्यात निसर्गाच्या लहरीपणाचा मोठा फटका बसला. अवेळी आलेला पाऊस आणि जोरदार गारपिटीमुळे शेतकऱ्यांचा हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेला असून, जिल्ह्यातील ३ हजार ३१५ शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. महसूल प्रशासनाने नुकसानीचे रीतसर पंचनामे पूर्ण केले असून, मार्च महिन्यातील नुकसानीचा सविस्तर अहवाल आता राज्य सरकारकडे निधी मागणीसाठी विभागीय आयुक्तांमार्फत पाठवण्यात आला आहे. साडेतीन हजार शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी ३ कोटी ३९ लाख ३५ हजार रुपयांची मागणी जिल्हा प्रशासनाने राज्य सरकारकडे केली आहे.**



महसूल प्रशासनाने तयार केलेल्या अहवालानुसार, मार्च महिन्यात झालेल्या या नैसर्गिक आपत्तीमुळे जिल्ह्यातील ५ तालुक्यातील शेतकऱ्यांना फटका बसला. यामधे एकूण १६६५ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले. यामधे सर्वाधिक फटका फळपिकांना बसला असून १०७५ हेक्टरवरील फळबागांचे मोठे नुकसान झाले होते. तर बागायत क्षेत्रावरील ५५५ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले होते. अवकाळी पावसामुळे जिरायत क्षेत्रावरील केवळ ३३ हेक्टरवरील पिकांना फटका बसला होता. मार्च महिन्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे लोहारा तालुक्यात सर्वाधिक ५९७ हेक्टरचे नुकसान झाले. त्याखालोखाल तुळजापूर ४४६ हेक्टर, वाशी २६२ हेक्टर, उमरगा १६२ हेक्टर तर नळदुर्ग अप्पर तहसील अंतर्गत १९४ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले होते. धाराशिव जिल्ह्यात मार्च आणि एप्रिल या दोन्ही महिन्यात अवकाळी पाऊस आणि गारपीट झाली होती. मात्र प्रशासनाने पंचनामे करून दोन्ही महिन्यांचे दोन स्वतंत्र अहवाल सादर केले आहेत. त्यानुसार मार्च महिन्यातील नुकसानीसाठी ३ कोटी ३९ लाख ३५ हजार ८२५ रुपयांची मागणी राज्य शासनाकडे केली आहे. पुढील मंत्रिमंडळाच्या बैठकीत याला मान्यता मिळण्याची शक्यता आहे. धाराशिव , परंडा आणि कळंब या तीन तालुक्यात मार्च महिन्यात झालेल्या पावसामुळे नुकसान झाले नव्हते. इतर पाच तालुक्यातील ३३१५ शेतकऱ्यांना अवकाळी पाऊस आणि गारपीटीची मदत मिळणार आहे.

### अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची स्थिती

**बाधित तालुके - ५**
**बाधित शेतकरी - ३३१५**
**बाधित क्षेत्र - १६६५**
**निधीची मागणी - ३ कोटी ३९ लाख ३५ हजार.**

### एप्रिलमधील नुकसानीचेही पंचनामे अंतिम टप्प्यात

मार्च महिन्याचा अहवाल सादर झाला असतानाच, एप्रिल महिन्यातही जिल्ह्यात पुन्हा एकदा अवकाळी पाऊस आणि गारपिटीने धुमाकूळ घातला होता. यात शेतपिकांसह पशुधनाचीही मोठी हानी झाली आहे. एप्रिलमधील नुकसानीच्या पंचनाम्याची प्रक्रिया आता पूर्ण झाली असून, त्याचा स्वतंत्र अहवालही लवकरच शासनाकडे पाठवला जाणार असल्याची माहिती महसूल प्रशासनाने दिली. एप्रिल महिन्यात वीज पडून जीवितहानी देखील झाली होती. त्याचा अहवाल लवकरच शासन दरबारी पाठवला जाणार आहे.

### बळीराजा मदतीच्या प्रतीक्षेत

खरीप हंगामात धाराशिव जिल्ह्यात अतिवृष्टी झाली. त्यामुळे हातातोंडाशी आलेल्या पिकांचे मोठे नुकसान झाले होते. रब्बी हंगामातील पिकांकडून अपेक्षा असतानाच अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे पिकांसह फळबागांचे नुकसान झाले. अल्पभूधारक शेतकऱ्याला अवकाळीने पुन्हा संकटात टाकले आहे. डोळ्यादेखत पिके नष्ट झाल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. हक्काचा पीक विमा देखील शेतकऱ्यांना मिळाला नाही. आता प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण होऊन शासनाकडून मदत कधी जाहीर होते आणि हा निधी प्रत्यक्षात शेतकऱ्यांच्या पदरात कधी पडतो, याकडे बळीराजाचे लक्ष लागले आहे.

### मदतीचे निकष

**जिरायत - हेक्टरी ८५००**
**बागायत - हेक्टरी १७०००**
**फळपिके - हेक्टरी २२५००**

# विमा प्रकरण निर्णायक टप्प्यात; पुढील तारखेला होणार अंतिम सुनावणी

## आमदार राणा जगजितसिंह पाटील यांची माहिती

**धाराशिवः** - खरीप २०२० मधील सोयाबीन पीक विम्याच्या प्रश्नावरून गेल्या चार वर्षांपासून सुरू असलेली लढाई आता अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. सर्वोच्च न्यायालय यांनी या प्रकरणात पुढील तारखेला 'अंतिम सुनावणी' घेण्याचे स्पष्ट आदेश दिले असून, त्यामुळे विमा कंपनीची चालढकल थांबण्याची शक्यता आहे. बुधवारी झालेल्या सुनावणीत विमा कंपनीने पुन्हा तांत्रिक मुद्द्यांचा आधार घेत खटला



लांबवण्याचा प्रयत्न केला. उच्च न्यायालयात जमा असलेल्या ७५ कोटी रुपयांवर आक्षेप घेत गोंधळ निर्माण करण्याचा प्रयत्न झाला. मात्र, शेतकऱ्यांच्या बाजूने उभे राहिलेले ज्येष्ठ विधीज्ञ बलबीर सिंग यांनी कंपनीची ही भूमिका उघड करत सुरुवातीपासूनची टाळाटाळ न्यायालयासमोर मांडली. त्यांचा युक्तिवाद ग्राह्य धरत न्यायालयाने उन्हाळी सुट्टीनंतर अंतिम सुनावणी घेण्याचे निर्देश दिले.दरम्यान, आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिल्लीत विधिज्ञांच्या टीमसोबत आखलेली रणनीती यशस्वी ठरल्याचे मानले जात आहे. ॲड. सुधांशू चौधरी आणि इतर वकिलांसह झालेल्या बैठकीत घेतलेले निर्णय शेतकऱ्यांच्या बाजूने जाताना दिसत आहेत.शेतकऱ्यांच्या हक्कासाठी हा लढा शेवटपर्यंत सुरू राहणार,असा विश्वास आमदार पाटील यांनी व्यक्त केला. आता अंतिम सुनावणीतच या प्रकरणाचा निकाल लागण्याची शक्यता असून, दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या विमा रकमेबाबत शेतकऱ्यांना दिलासा मिळेल का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# व्यावसायिक गॅस दरवाढीमुळे हॉटेलचे जेवण 10 ते 20 टक्क्यांनी महागले

**धाराशिव**:- व्यावसायिक एलपीजी गॅस सिलिंडरच्या दरात झालेल्या मोठ्या वाढीचा थेट परिणाम आता हॉटेल व्यवसायावर स्पष्टपणे दिसू लागला आहे. अलीकडेच जाहीर झालेल्या दरवाढीनंतर अवघ्या दुसऱ्याच दिवशी शहरातील तसेच जिल्ह्यातील अनेक हॉटेल चालक, रेस्टॉरंट मालक आणि रस्त्यावरील खाद्य विक्रेत्यांनी आपल्या पदार्थांच्या दरात 10 ते 20 टक्क्यांची वाढ केली आहे. परिणामी सर्वसामान्य ग्राहकांना हॉटेलमधील जेवणासाठी आता अधिक पैसे मोजावे लागत आहेत. व्यावसायिक एलपीजी सिलिंडरच्या दरात तब्बल 50 टक्क्यांपर्यंत वाढ झाली असून, एका सिलिंडरमागे सुमारे 993 रुपयांची भर पडली आहे. मागील दोन महिन्यांत दोन वेळा झालेल्या दरवाढीमुळे हॉटेल व्यवसायिकांचे आर्थिक गणित पूर्णपणे कोलमडले आहे. हॉटेल व्यावसायिकांच्या मते, आधीच कच्च्या मालाच्या वाढत्या किमती, इंधन खर्च आणि पुरवठा साखळीतील अडचणींमुळे व्यवसायावर ताण होता. अशातच गॅस दरवाढ झाल्याने खर्चाचा भार अधिक वाढला आहे. त्यामुळे हा वाढलेला खर्च ग्राहकांवर टाकण्याशिवाय पर्याय उरलेला नाही. दरवाढीमुळे केवळ ग्राहकांनाच नव्हे, तर या व्यवसायाशी संबंधित कामगारांवरही परिणाम होऊ लागला आहे. खानावळीचे दर देखील वाढले असून मासिक मेंबर असलेल्या ग्राहकांना महिन्याला 200 ते 300 रुपये जास्तीचे द्यावे लागणार आहेत. वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर ही दरवाढ सर्वसामान्यांच्या खिशाला आणखी झळ पोहोचवणारी ठरत आहे.

दैनिक आरंभ मराठी

## सप्टेंबर महिन्यात निवडणुका होण्याची शक्यता

# जिल्ह्यातील 428 ग्रामपंचायतींची अंतिम प्रभाग रचना प्रसिद्ध; आता प्रतीक्षा आरक्षण कार्यक्रमाची

आरंभ मराठी । धाराशिव

धाराशिव जिल्ह्यातील ४२८ ग्रामपंचायतींची अंतिम प्रभाग रचना सोमवारी (दि.४) जाहीर करण्यात आली असून ग्रामपंचायत कार्यालये, पंचायत समिती व तहसील कार्यालयांमध्ये ती प्रसिद्ध करण्यात आली आहे. यामुळे आगामी ग्रामपंचायत निवडणुकांच्या प्रक्रियेला वेग आला असून आता सर्वांचे लक्ष प्रभागनिहाय आरक्षण कार्यक्रमाकडे लागले आहे.जिल्ह्यातील या ४२८ ग्रामपंचायतींचा कार्यकाळ २०२५ - २६ मध्ये संपुष्टात आला असून सध्या त्या ठिकाणी प्रशासकांमार्फत कारभार चालवला जात आहे. पुढील सहा महिन्यांत निवडणुका होणे अपेक्षित असल्याने प्रशासनाने निवडणुकपूर्व तयारीला गती दिली आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार जिल्हा प्रशासनाने ७ एप्रिल रोजी प्रारूप प्रभागरचना प्रसिद्ध केली होती. यावर १३ एप्रिलपर्यंत हरकती व सूचना मागविण्यात आल्या होत्या. एकूण ४२८ पैकी ५८ ग्रामपंचायतींवर कोणतीही हरकत नोंदवली गेली नाही, तर ३७० ग्रामपंचायतींवर ११३ हरकती दाखल झाल्या. यामध्ये परंडा तालुक्यातील सर्वाधिक ७० ग्रामपंचायतींबाबत ५२ हरकती दाखल झाल्या होत्या. विशेष म्हणजे लोहारा व वाशी तालुक्यातील प्रभाग रचनेवर एकही हरकत नोंदवली गेली नाही, ही बाब लक्षवेधी ठरली. दाखल हरकतींपैकी ३३ हरकती मंजूर करण्यात आल्या, तर ६३ हरकती नामंजूर करण्यात आल्या. मंजूर हरकतींचा तालुकानिहाय विचार केला असता कळंब तालुक्यात सर्वाधिक १३ हरकती मान्य करण्यात आल्या. त्याखालोखाल परंडा (१०), भूम (८), तुळजापूर (४), उमरगा (२) आणि धाराशिव (१) असा क्रम लागतो. या सर्व हरकतींवर २१ एप्रिल रोजी संबंधित प्रांताधिकारी कार्यालयांमध्ये सुनावणी घेण्यात आली. सुनावणीनंतर काही हरकती ग्राह्य धरून आवश्यक ते बदल करण्यात आले, तर काही हरकती फेटाळण्यात आल्या. त्यानंतर जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी अंतिम प्रभाग रचनेला मंजुरी दिली. अंतिम मंजुरीनंतर तहसीलदारांनी आपल्या-आपल्या तालुक्यात प्रभागरचना प्रसिद्ध केली आहे. यानंतर पुढील महत्त्वाचा टप्पा म्हणजे प्रभागनिहाय आरक्षण जाहीर होणे हा आहे. आरक्षण कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर मतदारयादी अद्ययावत करण्याची प्रक्रिया सुरू होईल. या सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर राज्य निवडणूक आयोगाकडून ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणुकांचा अधिकृत कार्यक्रम जाहीर केला जाणार आहे. त्यामुळे जिल्ह्यातील ग्रामस्थ, इच्छुक उमेदवार आणि स्थानिक राजकीय पुढाऱ्यांमध्ये हालचालींना वेग आला असून आरक्षणाच्या घोषणेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. जिल्ह्यातील बहुतांश ग्रामपंचायतींमध्ये प्रशासक कारभार सुरू असल्याने निवडणुका लवकर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे गावपातळीवर राजकीय हालचालींना वेग आला आहे.




### सप्टेंबर किंवा ऑक्टोबर महिन्यात निवडणुकीची शक्यता

अंतिम प्रभाग रचना प्रसिद्ध केल्यानंतर आता आरक्षण सोडतीकडे लक्ष असणार आहे. सरपंच पदाचे आरक्षण मागच्या वर्षी जाहीर करण्यात आल्यामुळे इच्छुकांनी गावागावात निवडणुकीची तयारी सुरू केली आहे. मात्र, प्रभागातील आरक्षण जाहीर झाल्यानंतर तयारीला गती येणार आहे. आरक्षण, मतदार यादी यासाठी साधारणपणे दोन महिन्यांचा काळ जाणार आहे. जून आणि जुलै महिन्यात या प्रक्रिया पार पडल्यानंतर पावसाळा असल्याने निवडणुका दोन महिने उशिरा म्हणजे सप्टेंबर किंवा ऑक्टोबर महिन्यात होण्याची दाट शक्यता आहे. त्यादृष्टीने इच्छुक उमेदवारांची गावागावात तयारी सुरू झाली आहे.

### निवडणुका होणाऱ्या ग्रामपंचायतींची संख्या

| तालुका | - | ग्रामपंचायत संख्या |
| --- | --- | --- |
| धाराशिव | - | ६६ |
| तुळजापूर | - | ५३ |
| उमरगा | - | ४९ |
| लोहारा | - | २६ |
| कळंब | - | ५९ |
| वाशी | - | ३४ |
| भूम | - | ७१ |
| परंडा | - | ७० |
| एकूण | - | ४२८ |

# जादा दराने NCMC कार्ड काढल्यास परवाना रद्द करण्याचा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचा इशारा

आरंभ मराठी । धाराशिव

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) वतीने सवलतधारक प्रवाशांसाठी सुरू करण्यात आलेल्या NCMC (नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड) स्मार्ट कार्डच्या विक्रीत गैरप्रकार आढळल्याने राज्य सरकारने कडक भूमिका घेतली आहे. जादा दर आकारणाऱ्या अधिकृत विक्रेत्यांचे परवाने तात्काळ रद्द करण्यात येतील, असा स्पष्ट इशारा परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिला आहे. एसटी महामंडळाने राज्यभरात ३ हजारांहून अधिक अधिकृत विक्रेत्यांची नियुक्ती केली असून, प्रत्येक आगार आणि प्रमुख बसस्थानकांवर NCMC कार्ड उपलब्ध करून देण्यात आले आहे. नव्या कार्डसाठी १९९ रुपये, तर पूर्वी स्मार्ट कार्ड असलेल्या प्रवाशांसाठी १४९ रुपये दर निश्चित करण्यात आला आहे. मात्र, काही विक्रेत्यांकडून सवलतधारक प्रवाशांकडून अवाजवी शुल्क आकारले जात असल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर काही विक्रेत्यांचे परवाने आधीच रद्द करण्यात आल्याची माहितीही सरनाईक यांनी दिली. धाराशिव जिल्ह्यातील धाराशिव, तुळजापूर, कळंब येथील बस स्थानकावर या कॉर्डसाठी २५० ते ३०० रुपये आकारले जात होते. त्याविरोधात दैनिक आरंभ मराठीने वेळोवेळी आवाज उठवून त्यासंदर्भातील वृत्त प्रसिद्ध केले होते.



दरम्यान, एसटी सेवा अधिक पारदर्शक आणि डिजिटल करण्याच्या उद्देशाने NCMC कार्ड प्रणाली लागू करण्यात आली आहे. सध्या महिला, ज्येष्ठ नागरिक आणि 'अमृत' ज्येष्ठ नागरिकांची नोंदणी व कार्ड वितरण सुरू असून, लवकरच इतर सवलतधारक प्रवाशांनाही या योजनेत समाविष्ट केले जाणार आहे. महामंडळाच्या सूचनेनुसार, आगामी काळात सवलतधारक प्रवाशांसाठी एसटी प्रवासात NCMC कार्डचा वापर अनिवार्य केला जाणार आहे. यामुळे तिकीट वितरण, कार्ड टॉप-अप आणि इतर व्यवहार अधिक सुलभ व पारदर्शक होतील. तसेच, एकसंध मानक कार्यपद्धती (SOP) लागू करण्यात आली असून, सर्व आगार व्यवस्थापकांना तिची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या उपक्रमामुळे एसटी सेवा अधिक आधुनिक, पारदर्शक आणि प्रवासी-केंद्रित होणार असल्याचा विश्वास मंत्री सरनाईक यांनी व्यक्त केला आहे.

# राज्यात हे चाललंय तरी काय?

**रमेश कृष्णराव लांजेवार**
स्वतंत्र पत्रकार,
नागपूर.






पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील नसरापूर येथे अवघ्या ४ वर्षीय एका चिमुकलीवर किळसवाणे क्रौर्य घडल्याची अत्यंत धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. ६५ वर्षांच्या नराधमाने अत्याचार करून दगडाने ठेचून खून केल्याची ही घृणास्पद घटना शुक्रवारी उशिरा समोर आली. ही घटना लपविण्यासाठी आरोपीने चिमुकल्या मुलीचा मृतदेह शेणाच्या ढिगाऱ्याखाली लपवून ठेवला होता. या घटनेनंतर संपूर्ण नसरापूर परिसर स्तब्ध झाला असून सर्वत्र संतापाची लाट उसळली आहे. या घटनेचे पडसाद संपूर्ण महाराष्ट्रासह देशभर उमटले असून संपूर्ण देश सुन्न झाला आहे.राज्यात दिवसेंदिवस मुलींवरील अत्याचाराचे वाढते प्रमाण ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे. उपलब्ध आकडेवारीनुसार राज्यात दररोज २७ मुली वासनेच्या बळी ठरत आहेत. गेल्या १२० दिवसांत ३२७९ गुन्हे दाखल झाले आहेत. राज्यात दररोज चिमुकल्यांचे बालपण नराधमांकडून खुडले जात असल्याचे भीषण वास्तव पोलिस दलाच्या आकडेवारीवरून स्पष्ट होत आहे. मागील वर्षी राज्यात एकूण १० हजार १३१ पोक्सो गुन्हे दाखल झाले होते, तर चालू वर्षाच्या पहिल्या चार महिन्यांतच (एप्रिल अखेर) ३ हजार २७९ गुन्हे नोंदविले गेले आहेत.या आकडेवारीनुसार राज्यात दररोज सरासरी २७ चिमुकल्या वासनेच्या बळी जात असून दर ५३ मिनिटांनी एका अल्पवयीन मुलीवर अत्याचार झाल्याचा गुन्हा दाखल होत आहे. १ जानेवारी २०२५ ते २०२६ या कालावधीत तब्बल १३ हजार ४१० गुन्हे दाखल झाले आहेत. यामध्ये पुणे जिल्ह्याची स्थिती अत्यंत गंभीर आहे. पुणे ग्रामीण भागात एप्रिल अखेरपर्यंत १४० गुन्हे, पुणे शहरात १८१ गुन्हे, तर पिंपरी-चिंचवडमध्ये ११८ गुन्हे नोंदविले गेले आहेत. ही आकडेवारी पाहता मुलींवरील अत्याचाराची स्थिती राज्यासाठी अत्यंत चिंताजनक असल्याचे स्पष्ट होते. पोलिस विभाग अत्याचाराच्या गुन्ह्यांमध्ये आपली चोख भूमिका बजावत असला तरी कायद्याच्या प्रक्रियेत होणारा विलंब (कासवाच्या गतीने चालणारी प्रक्रिया) हा गुन्ह्यांमध्ये वाढ होण्यास कारणीभूत ठरत असल्याचे दिसून येते. त्यामुळे सरकारने पोलिस विभागाला अधिक सक्षम अधिकार देणे आवश्यक आहे. तसेच मुलींवरील अत्याचाराच्या प्रकरणांचा निकाल फास्ट ट्रॅक कोर्टांच्या माध्यमातूनच लावला गेला पाहिजे, जेणेकरून पीडितांना आणि त्यांच्या कुटुंबियांना त्वरित न्याय मिळेल. देशात शक्ती कायद्यानुसार गुन्हेगाराला २१ दिवसांत फाशी देण्याची तरतूद आहे, मात्र हा कायदा अद्याप केंद्राकडे अंतिम मंजुरीसाठी प्रलंबित आहे. जर हा कायदा लागू झाला असता, तर नसरापूर येथील नराधमाला २१ दिवसांत फाशीची शिक्षा झाली असती आणि अशा गुन्हेगारांवर कायद्याचा धाक बसला असता. परंतु सध्याच्या परिस्थितीत अशा गंभीर गुन्ह्यांचे निकाल वेळेवर लागत नाहीत, ही दुर्दैवी बाब आहे. नसरापूर येथील चिमुकलीवरील अत्याचार आणि हत्या तसेच चाकणजवळील महाळुंगे येथे तीन वर्षीय मुलावर झालेल्या अनैतिक अत्याचारानंतर गळा चिरून केलेल्या हत्येच्या घटनांनी संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. या घटनांविरोधात प्रचंड जनक्षोभ उसळला असून आरोपींना फाशीची शिक्षा देण्याची मागणी जोर धरत आहे. या घटना इतक्या भयावह आहेत की त्या संपूर्ण समाजाला सुन्न करून टाकणाऱ्या आहेत. आपला महाराष्ट्र संतांची भूमी म्हणून ओळखला जातो. मात्र अशा नराधमांमुळे आणि भोंदूबाबांच्या कृत्यांमुळे राज्यावर कलंक लागल्याचे दिसून येते. हा कलंक दूर करण्यासाठी चिमुकल्यांवर अत्याचार करणाऱ्यांना, तसेच अशा भोंदूबाबांना आणि त्यांना मदत करणाऱ्यांना कठोरात कठोर शिक्षा देणे अत्यावश्यक आहे.सध्या गाजत असलेले अशोक खरात प्रकरणही अत्यंत गंभीर आणि निंदनीय आहे. या प्रकरणात अनेक मोठी नावे समोर येत असल्याची चर्चा आहे. या सर्व बाबींची सखोल चौकशी करून सत्य बाहेर आणणे आणि न्यायव्यवस्था सुदृढ करणे ही काळाची गरज आहे.राज्यात यापूर्वीही अनेक अत्याचाराच्या घटना घडल्या, मात्र अनेक पीडितांना न्याय मिळालेला नाही. त्यामुळे आता तरी सरकारने आणि संबंधित यंत्रणांनी ठोस पावले उचलून अशा गुन्ह्यांना आळा घालावा. फास्ट ट्रॅक कोर्टांच्या माध्यमातून जलद निकाल देऊन गुन्हेगारांना कठोर शिक्षा करणे आवश्यक आहे.

## बदलत्या जीवनशैलीचे दाहक वास्तव मांडणारे नाटक 'चिरंजीव परफेक्ट बिघडलाय'




**आरंभ मराठी । धाराशिव**

आधुनिक जीवनशैलीच्या झगमगाटात आजची 'विवाह संस्था' एका नव्या वळणावर उभी आहे. जोडीदाराकडून असलेल्या अवास्तव अपेक्षा, त्यातून होणारा अपेक्षाभंग आणि त्यातूनच मानवी नात्यांना फाटा देऊन 'तांत्रिक पर्यायांकडे' झुकणारी मानवी मानसिकता, याचे जळजळीत चित्रण 'चिरंजीव परफेक्ट बिघडलाय' या नाटकाने धाराशिवकरांसमोर मांडले. माणूस हा कधीही 'परफेक्ट' किंवा परिपूर्ण असूच शकत नाही, उलट त्याचा अट्टाहास धरणे हे मानवी भावनेचे किती केविलवाणे प्रदर्शन आहे, याचा प्रत्यय देत या नाटकाने मानवी स्वभावाचे अनेक पदर रसिक प्रेक्षकांसमोर उलगडले आणि त्यांना अंतर्मुख होण्यास भाग पाडले.'चिरंजीव परफेक्ट बिघडलाय' या गाजलेल्या मराठी नाटकास धाराशिवमध्ये नाट्य रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, शाखा धाराशिव यांच्या वतीने मंगळवार, ५ मे रोजी रात्री ८ वाजता छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृह येथे या नाटकाचे आयोजन करण्यात आले होते. या नाटकाचे उद्घाटन जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे कार्यकारिणी सदस्य मुंबई विशाल शिंगाडे,नगरसेविका अर्चना विशाल शिंगाडे,डॉ. अभय शहापूरकर, राजेंद्र अत्रे, शेषनाथ वाघ, डी. जी. कुलकर्णी, सुगत सोनवणे, शशी माने, यांच्या हस्ते झाले. 'जिगीशा' निर्मित आणि चंद्रकांत कुलकर्णी प्रस्तुत या नाटकाचे लेखन व दिग्दर्शन विनोद रत्ना यांनी केले आहे. वैभव रंधवे, समृद्धी कुलकर्णी आणि श्रेयस जोशी यांनी प्रभावी अभिनय साकारत प्रेक्षकांची मने जिंकली. नेपथ्याची जबाबदारी ऋतुजा बोठे यांनी सांभाळली, तर प्रकाशयोजनेचे काम अभिप्राय कामठे यांनी पाहिले.नाटक यशस्वीतेसाठी विजय उंबरे,सुहास झेंडे,श्वेत चिलवंत, सारीपुत शिंगाडे, बापू माने, बापू साबळे यांनी परिश्रम घेतले.संपूर्ण नाटका दरम्यान प्रेक्षकांनी दिलेल्या टाळ्यांचा कडकडाट आणि प्रतिसाद उत्स्फूर्त मिळाला.

# दोन राष्ट्रगीतांचे जनक : गुरुदेव रवींद्रनाथ टागोर

आज ७ मे, भारत मातेचे महान सुपूत्र , चित्रकार, नाटककार, कादंबरीकार, बंगाली कवी, संगितकार गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांची जयंती. रवींद्रनाथ टागोर यांचा जन्म ७ मे १८६१ रोजी कोलकात्यातील जोर - सांको येथे झाला. त्यांच्या आईचे नाव शारदादेवी तर वडिलांचे नाव महर्षी देवेंद्रनाथ टागोर असे होते. रवींद्रनाथ टागोरांनी आपले शिक्षण घरीच विविध विषयांच्या खाजगी शिक्षकांच्या हाताखाली घेतले. त्यांनी लहान वयातच कविता लिहायला सुरुवात केली. वयाच्या आठव्या वर्षीच त्यांनी आपली पहिली कविता लिहिली. वयाच्या सोळाव्या वर्षी त्यांनी भानुसिंह या टोपण नावाने बऱ्याचशा कविता लिहिल्या. बॅरिस्टर होण्याआधी त्यांनी लंडनच्या युनिव्हर्सिटी कॉलेज येथे प्रवेश घेतला परंतु १८८० मध्ये कोणत्याही पदवी शिवाय ते बंगालमध्ये परतले. १४ नोव्हे १९१३ रोजी गीतांजली या रचनेबदद्ल स्वीडीश अकादमीचा नोबेल पुरस्कार त्यांना देण्यात आला. गीतांजलीचे भाषांतर स्वतः रवीन्द्रनाथांनीच केले होते. रवींद्रनाथ हे भारताचे व आशियाचे पहिले नोबेल विजेते होत. १९१५ साली त्यांना ब्रिटीश सरकारने 'सर' ही पदवी दिली. १९१९ च्या जालियनवाला बाग हत्याकांडानंतर त्यांनी ती सरकारला परत केली.



रवीन्द्रनाथांनी रचलेली जन गण मन व आमार शोनार बांग्ला ह्या रचना अनुक्रमे भारत व बांगलादेश यांची राष्ट्रगीते म्हणून स्वीकारण्यात आल्या आहेत. दोन राष्ट्रगीतांचे जनकत्व असलेले रवीन्द्रनाथ हे जगातील एकमेव कवी आहेत. पारंपारिक शिक्षण केवळ पोपटपंची शिकवते या विचारातून शांतिनिकेतनाचा क्रांतिकारक प्रयोग त्यांनी राबवला. रविंद्रनाथकालीन भारतामध्ये सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक चळवळींचे प्रमुख केन्द्रांपैकी एक असलेल्या महाराष्ट्राचा प्रभाव रवींद्रनाथांवरही पडला होता. संत तुकारामांच्या साहित्याचा त्यांनी अभ्यास केला होता. संत तुकारामांचे काही अभंग त्यांनी बंगाली भाषेत अनुवादित केले आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवनही त्यांच्या साठी प्रेरणास्थान होते. छत्रपती शिवाजी महाराजांवर त्यांनी एक खंडकाव्यही रचले आहे. शांतीनिकेतनाची उभारणी, विस्तृत व उच्च दर्जाच्या साहित्याची निर्मिती व रवीन्द्रसंगीताचे सृजन हे रवीन्द्रनाथांचे प्रमुख जीवनकार्य होय. रवींद्रनाथ टागोरांना गुरुदेव असे संबोधले जाते, १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात व २० व्या शतकाच्या प्रारंभी रवींद्रनाथांच्या कार्यामुळे बंगाली साहित्यात व बंगाली संगीतात आमूलाग्र बदल घडून आला. बंगाली साहित्याची रवींद्रपूर्व व रविंद्रोत्तर अशी विभागणी केली जाते यावरून बंगाली साहित्यावर रवींद्रनाथांच्या प्रभाव लक्षात येतो. एक महान कवी असण्यासोबतच ते एक महान देशभक्त होते त्यांनी स्वातंत्र्य संग्रामात मोठ्या संख्येने भारतीय लोकांना प्रभावित केले. ७ ऑगस्ट १९४१ रोजी रवींद्रनाथ टागोर यांचे निधन झाले. गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन.

**श्याम बसप्पा ठाणेदार**
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# जाणीव

**सारिका देशमुख**
धाराशिव



मुळात जाणीव हा शब्दच खूप काही सांगून जातो. जाणीव होण आणि जाणीव करून देण ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू म्हणावे लागेल.

असलेल्या गोष्टीची जाणीव झाली की नसलेल्या गोष्टीची उणीव भासत नाही आजकाल जाणीवच बोथट होत चाललेली आहे तर मग शब्दांचा काय . उपयोग ???

**जाणीवांना नसते**
**मायेची खाण**
**होत नाही जिथे**
**परिस्थिति ची जाण**

परिस्थितीची जाणीव असले की माणूस कसा सभागती राहतो. पण ज्याला जाणीवच होत नाही त्याचं काय???... जाणीव होणे आणि जाणीव करून देणे ह्या दोन वेगवेगळ्या बाबी आहेत.

ज्याला जाणीव असते किंवा होते तो नेहमीच नरमाईने वागत असतो. जेव्हा एखादा मुलगा दिव्या कडे जात असेल आणि जर त्याला तो दिवा पोळला तर पुन्हा त्या दिव्याला हात नाही लावणार .कारण त्याला जाण झाली की याला हात लावला तर तो पोळणार



नक्कीच...

चांगल्या वाईट गोष्टीची जाणीव होण खूप महत्त्वाच आहे आणि ती प्रत्येकाला होतच असते पण कोणी दाखवत असतं तर कोणी येड्याच सोंग घेत.

पण जर कधी आपण कोणाला एखाद्या गोष्टीची जाणीव करून दिली तर ते त्याला आवडत नसतं कारण त्याचा इगो प्रचंड दुखावला जातो आणि समोरच्याबद्दल त्याच्या मनात द्वेषभाव निर्माण होतो.पण जाणीव असणारा माणूस संवेदनशील दयाळू आणि संयमी असतो.

जाणिवेमुळे बाहेरच्या जगाशी संपर्क येतो आणि कुठेतरी मानसिक आणि भावनिक शांतता लोप पावत जाते.

जाणिवेमुळे बाहेरील जगाशी संपर्क साधला जातो. कधी कधी मानसिक आणि भावनिक शांतता लोप पावते तरीही जाणीव आवश्यक असते.

एखाद्या गोष्टीची जाणीव होणे म्हणजे ती गोष्ट पण पूर्णपणे जाणणे होय ती गोष्ट जाणूनच आयुष्यात पुढे जाता येत.जा जाणीवे मुळे यश मिळत जातं आणि यश मिळत गेलं की आयुष्याकडे बघण्याचा दृष्टिकोन सकारात्मक होत जातो. ज्याला परिस्थितीची जाणीव होते तो आपल्या आयुष्यात यशाचे शिखर गाठल्याशिवाय राहत नाही. आणि तिथेच त्याच्या प्रगतीची वाटचाल सुरू होते. आणि त्याची नवीन ओळख निर्माण होते .

बरोबर ना!!!!

# बार्शी - बोरफळ रस्त्यावर अपघातांची मालिका सुरूच, धोकादायक रस्त्यामुळे तरुणाचा मृत्यू

## कंत्राटदारावर गुन्हा दाखल करण्याची आमदार कैलास पाटील यांची मागणी

**आरंभ मराठी । धाराशिव**

धाराशिव शहरातील जिजाऊ चौक ते बोरफळ (राज्य मार्ग क्र. ६८) या महत्त्वाच्या रस्त्याचे काम गेल्या दीड वर्षांपासून अत्यंत संथ गतीने सुरू असून, निष्काळजीपणामुळे अपघातांची मालिका सुरूच आहे. याच निष्काळजीपणाचा बळी ठरून ५ मे २०२६ रोजी रात्री ९ वाजण्याच्या सुमारास सांजा गावाजवळ भंडारवाडी येथील ओम दिलीप अंधारे या तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला. सदर ठिकाणी पुलाचे काम सुरू असतानाही कोणताही संरक्षण कठडा, दिशादर्शक फलक किंवा रेडियम चिन्ह लावण्यात आलेले नव्हते. त्यामुळे अंधारात रस्त्याचा अंदाज न आल्याने ओम अंधारे यांची दुचाकी थेट १० ते १५ फूट खोल खड्ड्यात कोसळली. या भीषण अपघातात त्यांचा जागीच मृत्यू



झाला. याच ठिकाणी दोन दिवसांपूर्वी स्कॉर्पिओ वाहनाचा अपघात झाला होता. या अपघातात ३ ते ४ प्रवासी गंभीर जखमी झाले असून, त्यापैकी दोघांची प्रकृती अद्याप चिंताजनक असल्याची माहिती आहे. वारंवार अपघात होत असतानाही संबंधित प्रशासन आणि कंत्राटदाराने कोणतीही ठोस सुरक्षात्मक उपाययोजना न केल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेना (उबाठा) पक्षाने आक्रमक भूमिका घेतली असून, आमदार कैलास पाटील यांनी संबंधित कंत्राटदारावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. तसेच सांजा गावातील नागरिकांनीही या निष्काळजीपणाविरोधात आवाज उठवत आंदोलनाचा इशारा दिला आहे. काम वेळेत व नियमांनुसार पूर्ण न केल्यास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. बार्शी-भातंबरे-धाराशिव-सारोळा-शिवली-बोरफळ या मार्गाचे रुंदीकरण व दुरुस्तीचे काम मंजूर असून, या रस्त्याची एकूण लांबी ४७.६४ किमी आहे. या प्रकल्पासाठी तब्बल २८६.६६ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. मात्र, प्रत्यक्षात कामाचा वेग अत्यंत मंद असून, दर्जाबाबतही प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. दरम्यान, धाराशिव शहरातील राजमाता जिजाऊ चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौकादरम्यानही रस्ता अनेक ठिकाणी खोदून ठेवण्यात आला असून, अपूर्ण आणि निकृष्ट कामामुळे रोजच अपघात घडत आहेत. नागरिकांनी वारंवार तक्रारी करूनही सार्वजनिक बांधकाम विभागाकडून याची गंभीर दखल घेतली जात नसल्याने संताप वाढत आहे. एकीकडे कोट्यवधींचा निधी खर्च केला जात असताना, दुसरीकडे नागरिकांच्या जीवाशी खेळ सुरू असल्याचा आरोप होत आहे. आता तरी प्रशासन जागे होऊन तातडीने सुरक्षात्मक उपाययोजना करेल का, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

# शिराढोण ग्रामपंचायत प्रकरणात मोठा दिलासा ; सरपंच लक्ष्मी म्हेत्रे यांची अपात्रता रद्द

**आरंभ मराठी । शिराढोण**

कळंब तालुक्यातील शिराढोण ग्रामपंचायतीतील वादग्रस्त प्रकरणाला अखेर राज्य पातळीवर नवे वळण मिळाले असून सरपंच लक्ष्मी दिलीप म्हेत्रे यांना मोठा दिलासा मिळाला आहे. ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांच्या न्यायालयाने विभागीय आयुक्तांनी दिलेला अपात्रतेचा आदेश रद्द करत म्हेत्रे यांचे अपील मंजूर केले आहे. या प्रकरणाची सुरुवात उपसरपंच अमित माकोडे यांनी दाखल केलेल्या तक्रारीतून झाली होती. १५ व्या वित्त आयोगाच्या निधीच्या वापराबाबत गंभीर आक्षेप घेत, पाणीपुरवठा योजनेतील काही कामे अपूर्ण असतानाही देयके अदा केल्याचा आरोप करण्यात आला होता. पाइपलाइन टाकणे, वॉल्व बसविणे आणि रोड क्रॉसिंगसारख्या कामांमध्ये त्रुटी असल्याचे नमूद करण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर विभागीय स्तरावर चौकशी होऊन छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्तांनी सरपंचांना अपात्र ठरविण्याचा आदेश दिला होता. मात्र, या निर्णयाविरोधात सरपंच लक्ष्मी म्हेत्रे यांनी मंत्री स्तरावर अपील दाखल केले. सुनावणीदरम्यान अपीलार्थी, तक्रारदार उपसरपंच, तसेच संबंधित प्रशासकीय आणि तांत्रिक अधिकाऱ्यांचे सविस्तर युक्तिवाद ऐकण्यात आले. सादर कागदपत्रांनुसार संबंधित कामे तांत्रिक अधिकाऱ्यांच्या



देखरेखीखाली पूर्ण झाल्याचे स्पष्ट झाले. कार्यकारी अभियंता व शाखा अभियंत्यांनी काम पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र दिल्यानंतरच देयके अदा करण्यात आल्याचा मुद्दा निर्णायक ठरला. तसेच काही ठिकाणी प्रशासकीय त्रुटी आढळल्या असल्या तरी त्या गंभीर स्वरूपाच्या नसून निधी अपहार किंवा जाणीवपूर्वक गैरव्यवहार सिद्ध होत नसल्याचेही आदेशात नमूद करण्यात आले. याशिवाय, प्रत्यक्ष कामाची अंमलबजावणी आणि मोजमाप ही संबंधित अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली होत असल्याने त्यांची जबाबदारीही अधोरेखित करण्यात आली. सर्व बाबींचा विचार करून मंत्री जयकुमार गोरे यांनी विभागीय आयुक्तांचा अपात्रतेचा आदेश रद्द केला आणि सरपंच लक्ष्मी म्हेत्रे यांचे अपील मंजूर केले. संबंधित अधिकाऱ्यांना या निर्णयाची तत्काळ अंमलबजावणी करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

हे पत्र मालक, मुद्रक, संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी,गवळी वाडा धाराशिव, ता. जि. धाराशिव, येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव)
संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८० RNI NO.-2023/90078 कार्यालय; सुकर्मा कॅपिटल, बार्शी नाका, जिजाऊ चौक, धाराशिव-४१३५०१.मो. ९४२२०६८४२२. This letter was published by owner, printer, editor Chandrasen Govindrao Deshmukh, printed at Aadesh Printers, Ramkrishna Colony, Gawli Wada Dharashiv, Ta. Dist. Dharashiv, and published at Ramkrishna Colony, Gawli Wada, Dharashiv (Maharashtra).
पुणे कार्यालयः1012,विंग B, पूर्वांचल,वेबग्योर स्कुलशेजारी, वाघोली,पुणे.

## विविध वृत्त

# पाणवठे कोरडे पडल्याने वन्यजीव धोक्यात; लाखो रुपयांचा खर्च वाया

# वन विभागाचा निष्काळजीपणा, पाण्याअभावी अर्धी रोपे जळाली





आरंभ मराठी । येरमाळा

**येरमाळा येथील श्री येडेश्वरी मंदिर परिसरालगत असलेल्या सुमारे साडेसहाशे एकर वनक्षेत्रात वनविभागाच्या हलगर्जीपणामुळे गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. या परिसरात मोर, हरिण, काळवीट, वानर यांसह विविध वन्यप्राण्यांचे वास्तव्य असून सध्या पाण्याअभावी त्यांच्या अस्तित्वावरच संकट ओढवले आहे. वनविभागाच्या दुर्लक्षामुळे वनसंपत्ती आणि वन्यजीव दोन्ही धोक्यात आले असल्याचे वास्तव समोर येत आहे.**

वन्यप्राण्यांच्या पाण्याच्या गरजेसाठी येडेश्वरी मंदिर परिसरात आठ पाणवठे तयार करण्यात आले होते. मात्र यापैकी अनेक पाणवठे गेल्या वर्षभरापासून तुटलेल्या अवस्थेत पडून आहेत. त्यांची दुरुस्ती करण्यासाठी वनविभागाने कोणतीही कार्यवाही केलेली नाही. परिणामी तयार केलेले पाणवठे पूर्णपणे कोरडे पडले असून, ऑक्टोबरपासून उन्हाळ्याचा कालावधी मोठ्या प्रमाणात सरला असतानाही पाण्याची कोणतीही पर्यायी व्यवस्था करण्यात आलेली नाही. या गंभीर दुर्लक्षामुळे वन्यप्राणी पाण्याच्या शोधात जंगलाबाहेर भटकू लागले आहेत. काही प्राणी गावांच्या हद्दीत शिरू लागल्याने मानव-वन्यप्राणी संघर्षाची शक्यता वाढली आहे. शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.दरम्यान, वनविभागाकडून अलीकडेच सुमारे ५० हजार रोपांची लागवड करण्यात आली होती. मात्र पाण्याच्या अभावामुळे यापैकी जवळपास ५० टक्के रोपे जळून गेल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. याशिवाय गतवर्षी राबविण्यात आलेल्या घनवन प्रकल्पातील दोन ते तीन प्लॉटही वाळून चालले आहेत. यामुळे लाखो रुपयांचा खर्च वाया गेल्याची चर्चा होत आहे. या सर्व परिस्थितीमागे वनमजुरांच्या नियोजनाचा अभाव हे प्रमुख कारण असल्याचे दिसून येत आहे. उपळाई वन विभाग गट क्रमांक ६४४ मध्ये गेल्या दहा वर्षांपासून कार्यरत असलेल्या अनुभवी वनमजुराला अचानक कामावरून कमी करण्यात आले. त्याऐवजी नेमण्यात आलेला नवीन वनमजूर नियमितपणे हजर राहत नसल्याची माहिती स्थानिकांकडून मिळत आहे. परिणामी वनसंवर्धन, पाण्याची देखभाल आणि रोपांचे संरक्षण यासारखी महत्त्वाची कामे पूर्णपणे ठप्प झाली आहेत. स्थानिक नागरिकांनी वनविभागाच्या कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. वन्यजीवांसाठी पाण्याची साधी व्यवस्था देखील करण्यात येत नाही, ही अत्यंत गंभीर बाब आहे. प्रशासनाने वेळेत लक्ष दिले नाही तर मोठे नुकसान होऊ शकते, अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

### प्रशासनाने तातडीने लक्ष देण्याची गरज

सध्याची परिस्थिती पाहता वनविभागाने तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे. कोरडे पडलेले पाणवठे तातडीने दुरुस्त करून टँकरद्वारे पाणीपुरवठा करणे, सौरऊर्जेवर चालणारी पाणीपुरवठा यंत्रणा उभारणे, वनमजुरांची नियमित व जबाबदार नियुक्ती करणे,जळालेल्या रोपांचे पुनर्लागवड व संरक्षणासाठी 'ड्रिप' किंवा 'मल्चिंग'सारख्या आधुनिक पद्धतींचा वापर अशा उपाययोजना केल्या तरच वनसंपत्ती आणि वन्यजीवांचे संरक्षण होऊ शकते. अन्यथा येत्या काळात या भागातील पर्यावरणीय समतोल बिघडण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

## केंद्रीय मंत्री डॉ. रामदास आठवले यांचा धाराशिव जिल्ह्याच्या वतीने सत्कार



आरंभ मराठी । धाराशिव

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तसेच केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांचा कुर्डूवाडी येथे धाराशिव जिल्ह्याच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. यामध्ये जिल्हा सरचिटणीस सिद्धार्थ ओव्हाळ, जिल्हा कार्याध्यक्ष सोमनाथ गायकवाड, जिल्हा उपाध्यक्ष संदिपान कांबळे तसेच मराठा आघाडी महाराष्ट्र प्रदेशचे उपाध्यक्ष रविराज पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

## महाराष्ट्र दिनी गिरवली येथील लोकसेवा हायस्कूलचा गौरव

आरंभ मराठी । भूम

महाराष्ट्र दिनानिमित्त पंचायत समिती भूम येथे आयोजित पुरस्कार सोहळ्यात गिरवली येथील लोकसेवा हायस्कूलचा विशेष सन्मान करण्यात आला. 'मुख्यमंत्री माझी सुंदर शाळा' उपक्रमात शाळेने पहिल्याच टप्प्यात जिल्ह्यात द्वितीय क्रमांक मिळवत उल्लेखनीय कामगिरी केली. याबद्दल शाळेला दोन लाख रुपयांचे बक्षीस मिळाले असून मुख्याध्यापकांचा विशेष सत्कार करण्यात आला. गटशिक्षणाधिकारी राहुल भट्टी यांच्या हस्ते हा गौरव करण्यात आला. शाळेने अल्पावधीत केलेल्या शैक्षणिक व भौतिक विकासासह विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी राबविलेल्या उपक्रमांची दखल घेण्यात आली. यावेळी २७ शिक्षकांना 'आदर्श शिक्षक पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले.

## राजर्षी शाहू महाराज पुण्यतिथीनिमित्त श्रीपतराव भोसले विद्यालयात अभिवादन




आरंभ मराठी । धाराशिव

श्रीपतराव भोसले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात लोकराजा राजर्षी शाहू महाराज यांना पुण्यतिथीनिमित्त अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमात जिल्हा परिषद शिक्षण विभागाचे विस्तार अधिकारी भारत देवगुडे, प्राचार्य तथा मुख्याध्यापक नंदकुमार नन्नवरे आणि इयत्ता पाचवीचे पर्यवेक्षक शेषनाथ वाघ यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यानंतर मनोगत व्यक्त करताना प्राचार्य नन्नवरे यांनी राजर्षी शाहू महाराजांच्या शैक्षणिक, सामाजिक, कुस्ती व व्यावसायिक क्षेत्रातील कार्याचा गौरव केला. त्यांच्या दूरदृष्टीमुळे कोल्हापूरचे नाव जागतिक स्तरावर पोहोचले असल्याचे त्यांनी नमूद केले. या प्रसंगी कलाध्यापक शिवाजी भोसले, सहशिक्षक हुकुमचंद कानडे, संतोष देशमुख, ए. सी. पवार, सौ. देवकन्या कांबळे, रमेश जगताप, लिपीक नवनाथ तांबारे, अजित जगताप, सुहास वाघमारे, उमेश गायकवाड, श्रीमती भाग्यश्री पवार तसेच सेवक बापू आदमाने आदी उपस्थित होते

## जागतिक पुस्तक दिनानिमित्त बालरोग परिषदेकडून वैद्यकीय विद्यार्थ्यांना 250 हून अधिक पुस्तके प्रदान

आरंभ मराठी । धाराशिव

वाचन संस्कृतीला चालना देत वैद्यकीय शिक्षण अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने जागतिक पुस्तक दिनानिमित्त बालरोग परिषद, धाराशिव शाखेकडून शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव येथे पुस्तके भेट देण्याचा उपक्रम राबविण्यात आला. दिनांक २३ एप्रिल २०२६ रोजी आयोजित या कार्यक्रमात महाविद्यालयाच्या ग्रंथालयासाठी बालरोग विषयक महत्वाची व उपयुक्त अशी एकूण २५० हून अधिक पुस्तके प्रदान करण्यात आली.या पुस्तकांमुळे वैद्यकीय विद्यार्थ्यांना तसेच निवासी डॉक्टरांना अभ्यासासाठी मोलाची सहाय्यता होणार असल्याचे सांगण्यात आले. जागतिक पुस्तक दिन दरवर्षी २३ एप्रिल रोजी साजरा केला जातो.या दिवशी वाचनाची संस्कृती वाढावी, ज्ञानाचा प्रसार व्हावा आणि समाजात पुस्तकांचे महत्त्व अधोरेखित व्हावे हा मुख्य उद्देश असतो. या पार्श्वभूमीवर राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. या कार्यक्रमास शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.शैलेंद्र चौहान, वैद्यकीय उपअधीक्षक डॉ. प्रवीण डुमणे, बालरोग विभागप्रमुख डॉ.शाम चौधरी, डॉ.घोगरे, डॉ. निलोफर भोरी तसेच वैद्यकीय अधिकारी डॉ.संजय सोनटक्के, डॉ. बागल, डॉ.देशमुख आणि ग्रंथपाल श्री. निलेश खोलासे यांची उपस्थिती होती. महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.शैलेंद्र चौहान यांनी बालरोग परिषद, धाराशिव शाखेचे आभार मानले. डॉ.दत्तात्रय खुणे, सचिव डॉ.नितीन भोसले, ज्येष्ठ बालरोगतज्ज्ञ डॉ.अभय शहापूरकर तसेच डॉ.हंबीरे यांचीही उपस्थिती होती.

## अणदूरमध्ये जवाहर परिवाराकडून गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

आरंभ मराठी । अणदूर

शिक्षण प्रसारक मंडळाच्या जवाहर परिवार, अणदूर यांच्या वतीने बारावी परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा उत्साहात पार पडला. सचिव रामचंद्र आलुरे यांच्या हस्ते जवाहर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विज्ञान, कला, वाणिज्य व किमान कौशल्य शाखांमधील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावलेल्या विद्यार्थ्यांचा शाल, पुष्पहार व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. या प्रसंगी भक्ती नरवडे, पंडित हांडगे, रेणुका व्हन्ड्रे, तस्लीम पिंजारी, अंकिता जाधव, श्रावणी हब्बू, प्रतिज्ञा मंडोळकर, मयुरी शिरगिरे, कादंबरी सुतार, शंभू दळवे, शुभम शिंदे, फिरदोस शेख, सना पठाण, वेदांत बिराजदार आणि श्रावणी पंचधारे या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. सत्कारप्रसंगी मार्गदर्शन करताना रामचंद्र आलुरे म्हणाले की, मिळालेल्या यशाने हुरळून न जाता पुढील यशासाठी अधिक मेहनत घेणे आवश्यक आहे. आजच्या स्पर्धात्मक युगात सातत्य, चिकाटी आणि योग्य दिशेने प्रयत्न केल्यासच यश मिळते. कमी गुण मिळाल्यामुळे खचून न जाता स्वतःचे क्षेत्र निश्चित करून सातत्याने अभ्यास करत राहावे. आई-वडिलांचे कष्ट लक्षात ठेवून प्रगती साधावी आणि जीवनातील प्रत्येक अडचणीवर मात करण्याची तयारी ठेवावी, असे त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले. या कार्यक्रमास मुख्याध्यापक गोपाळ कुलकर्णी, पालक, प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन रोहित मोरे यांनी केले.

## राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) पक्षाची आढावा बैठक उत्साहात; अल्पसंख्याक विभागाच्या बळकटीवर भर



आरंभ मराठी । धाराशिव

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार गट) धाराशिव जिल्हा अल्पसंख्याक विभागाची आढावा बैठक जिल्हा कार्यालयात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. संघटन बळकटीकरण, आगामी राजकीय रणनीती तसेच विभागीय कामकाजाचा सखोल आढावा या बैठकीत घेण्यात आला. या बैठकीस निरीक्षक म्हणून जावेद खरेदी यांची प्रमुख उपस्थिती लाभली. जीवनरावजी गोरे, जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह वेदप्रकाश पाटील, तसेच जिल्हाध्यक्ष तोफिक भाई शेख यांच्या नेतृत्वाखाली बैठक यशस्वीरित्या पार पडली. अल्पसंख्याक विभागातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा मोठ्या संख्येने सहभाग होता. बैठकीदरम्यान प्रदेश सरचिटणीस मसूद भाई शेख, कादरभाई खान, युवक जिल्हाध्यक्ष शेखरजी घोडके, महिला जिल्हाध्यक्ष मनीषाताई पाटील, शहराध्यक्ष तथा नगरसेवक बबलू शेख, कळंब तालुकाध्यक्ष प्रा. तुषार वाघमारे, डॉक्टर सेल जिल्हाध्यक्ष डॉ. अविनाश तांबारे, ज्योतीताई माळाळे, रमेश देशमुख, अहमद काजी, नगरसेवक सुनील आंबेकर, पंकज भोसले, सर्फराज कुरेशी, नर्सिंग मेटकरी, इजाज काजी, शिक्षक सेल जिल्हाध्यक्ष प्रा. जालिंदर पोळ, अभियंता सेल जिल्हाध्यक्ष सुरज वडवळे, ॲड. योगेश सोन्नेपाटील, लीगल सेल जिल्हाध्यक्ष ॲड. अविनाश जाधव, माजी सैनिक विभाग जिल्हाध्यक्ष दत्ताजी राऊत, शहर उपाध्यक्ष हेमंत भोरे, असिफ शेख, सुरज सुकळे, अनिल जाधव, संघटित कामगार सेल जिल्हाध्यक्ष सरफराज पटेल, असंघटित कामगार सेल जिल्हाध्यक्ष उमेश शिरसाटे, मलंग शेख, माजी नगरसेवक बाबा मुजावर, लीगल सेल तालुका अध्यक्ष ॲड. बाळासाहेब आव्हाड, लीगल सेल शहराध्यक्ष किरण रोकडे, वैद्यकीय मदत जिल्हाध्यक्ष डॉ. सय्यद फाद, सामाजिक न्याय विभाग जिल्हाध्यक्ष बाळासाहेब कसबे यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. या बैठकीत अल्पसंख्याक विभागाच्या संघटनात्मक मजबुतीसाठी विविध उपाययोजना, कार्यकर्त्यांचे प्रबोधन, तसेच आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्षाची भूमिका यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

## जिल्हा विधीज्ञ मंडळाच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत ॲड. खंडेराव चौरे विजयी; ॲड. तांबे यांचा 198 मतांनी पराभव



आरंभ मराठी । धाराशिव

जिल्हा विधीज्ञ मंडळाच्या वार्षिक निवडणुकीत यंदा अध्यक्षपदासाठी चुरशीची लढत पाहायला मिळाली. या लढतीत ॲड. खंडेराव हरिश्चंद्र चौरे यांनी १९८ मताधिक्याने विजय मिळवत अध्यक्षपद पटकावले. त्यांनी ॲड. सुधाकर तांबे यांचा पराभव केला. या निवडणुकीत ॲड. तांबे यांना १३४ मते मिळाली. यंदाच्या निवडणुकीत बिनविरोध निवड झालेल्या उमेदवारांव्यतिरिक्त अध्यक्ष, उपाध्यक्ष (सर्वसाधारण), उपाध्यक्ष (महिला राखीव) आणि महिला प्रतिनिधी या चार पदांसाठी मतदान झाले. सर्वसाधारण उपाध्यक्षपदासाठी ॲड. इंद्रजित चिंतामणराव शिंदे आणि ॲड. सुधीर विठ्ठलराव नन्नवरे यांच्यात सामना रंगला. एकूण ५१४ मतांपैकी ॲड. नन्नवरे यांना ४१४ मते मिळाली, तर ॲड. शिंदे यांना केवळ ७८ मते मिळाली. ॲड. नन्नवरे यांनी तब्बल ३३६ मतांच्या फरकाने विजय मिळवला. उपाध्यक्ष (महिला राखीव) पदासाठी ॲड. सारीका नागनाथ मुंडे-पाटील आणि ॲड. उज्वला गोरख इंगळे यांच्यात लढत झाली. ५१९ वैध मतांपैकी ॲड. मुंडे-पाटील यांना २९५ मते, तर ॲड. इंगळे यांना २०२ मते मिळाली. मुंडे-पाटील यांनी ९३ मतांनी विजय मिळवला. महिला प्रतिनिधी पदासाठी ॲड. अर्चना रामहरी नवले आणि ॲड. मायादेवी सुभाष सरवदे यांच्यात झालेल्या लक्षवेधी लढतीत ॲड. नवले यांनी २१४ मतांच्या फरकाने दणदणीत विजय मिळवला. या निवडणुकीचे मुख्य निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून ॲड. नितीन भोसले यांनी काम पाहिले. निकाल जाहीर होताच विजयी उमेदवारांच्या समर्थकांनी गुलाल उधळत जल्लोष केला व सर्व विजेत्यांचा सत्कार करण्यात आला. दरम्यान, ॲड. खंडेराव चौरे हे भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष असून पक्षातील सक्रिय पदाधिकारी म्हणून ओळखले जातात.

आरंभ मराठी

## जिल्हाधिकारी कार्यालयाच्या दिरंगाईवर संताप

# आपले सरकार सेवा केंद्राचे अर्ज रखडले

आरंभ मराठी । नारंगवाडी

धाराशिव जिल्ह्यात 'गाव तिथे आपले सरकार सेवा केंद्र' हा महत्त्वाकांक्षी उपक्रम प्रभावीपणे राबविण्याच्या उद्देशाने सप्टेंबर २०२५ पर्यंत मोठ्या प्रमाणावर अर्ज स्वीकारण्यात आले होते. मात्र, अर्ज स्वीकारल्यानंतर अनेक महिने उलटूनही जिल्हाधिकारी कार्यालयाकडून कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने अर्जदारांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. प्रशासनाकडून केवळ प्राप्त अर्जांची साधी यादी पुढे पाठवण्यात आली असून त्यानंतरची संपूर्ण प्रक्रिया ठप्प झाल्याचा आरोप अर्जदारांकडून करण्यात येत आहे.




या योजनेचा उद्देश ग्रामीण भागातील नागरिकांना विविध शासकीय सेवा त्यांच्या गावातच उपलब्ध करून देणे हा आहे. त्यामुळे रोजगाराच्या संधी निर्माण होण्याबरोबरच नागरिकांची शासकीय कामांसाठी होणारी धावपळही कमी होणार होती. मात्र, जिल्हा प्रशासनाच्या उदासीन भूमिकेमुळे हा उपक्रम प्रत्यक्षात कागदावरच राहिल्याचे चित्र दिसत आहे. अर्ज स्वीकृतीनंतर पात्र-अपात्र यादी जाहीर करणे, कागदपत्रांची पडताळणी, अंतिम मंजुरी असे महत्त्वाचे टप्पे अद्याप पूर्ण झालेले नाहीत. या प्रक्रियेत प्रशासन पूर्णपणे मौन बाळगून असल्याने अनेक युवक व इच्छुक उद्योजक संभ्रमात आहेत. काहींनी यासाठी आर्थिक गुंतवणूक व तयारीही केली असून वेळ आणि पैशांचे नुकसान होत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. दरम्यान, महसूल मंत्र्यांनी या प्रकरणात तात्काळ लक्ष घालून जिल्हाधिकारी कार्यालयाला स्पष्ट निर्देश द्यावेत. तसेच, सर्व अर्जदारांची पात्र व अपात्र यादी तात्काळ जाहीर करून पुढील प्रक्रिया पारदर्शकपणे व वेळेत पूर्ण करण्यात यावी, अशी मागणी होत आहे. शासनाच्या महत्त्वाच्या योजनेला गती देण्यासाठी आता वरिष्ठ पातळीवर तातडीने हस्तक्षेप होण्याची गरज निर्माण झाली आहे.

## ध्वजदिन निधी संकलनात धाराशिव राज्यात तिसरे

आरंभ मराठी । धाराशिव

सशस्त्र सेना ध्वजदिन २०२४ निमित्त निधी संकलनात उल्लेखनीय कामगिरी करत धाराशिव जिल्ह्याने राज्यात तिसरा क्रमांक पटकावला आहे. या उत्कृष्ट कार्याची दखल घेत पालकमंत्री प्रतापराव सरनाईक यांच्या हस्ते १ मे रोजी जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार तसेच जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांचा सन्मान करण्यात आला. ७ डिसेंबर हा दिवस सशस्त्र सेना ध्वजदिन म्हणून पाळण्यात येतो. या निमित्ताने दरवर्षी ७ डिसेंबरपासून पुढील वर्षाच्या नोव्हेंबर अखेरपर्यंत निधी संकलन मोहीम राबविण्यात येते. ध्वजदिन निधी-२०२४ साठी महाराष्ट्र शासनाकडून धाराशिव जिल्ह्यास ५७ लक्ष रुपये इतके उद्दिष्ट देण्यात आले होते. मात्र जिल्ह्यातील विविध शासकीय व निमशासकीय कार्यालये तसेच विविध संस्थांच्या सक्रिय सहकार्यामुळे हे उद्दिष्ट केवळ पूर्णच झाले. शिवाय त्यापेक्षा कितीतरी पटीने अधिक निधी संकलित करण्यात आला. एकूण १ कोटी ३४ हजार ८४ हजार रुपये इतका निधी जमा करण्यात आला असून, हे प्रमाण दिलेल्या उद्दिष्टाच्या तब्बल २३६.५६ टक्के इतके आहे. या उल्लेखनीय यशामुळे जिल्हा राज्यात तिसऱ्या क्रमांकावर आला आहे. या पार्श्वभूमीवर १ मे २०२६ रोजी झालेल्या कार्यक्रमात संचालक, सैनिक कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य,पुणे यांचेकडून प्राप्त स्मृतिचिन्ह जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार व जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांना प्रदान करण्यात आले.

# हायटेक महावितरण, तरीही ग्राहक असंतुष्ट

# स्मार्ट मीटरनंतरही सेवेत मोठी दरी

## वीजबिल, लोडशेडिंग आणि स्वयंचलित वीज बंदीवर प्रश्नचिन्ह

अमोलसिंह चंदेल । आरंभ मराठी

**शिराढोण : राज्यातील वीज वितरण क्षेत्रात तांत्रिक क्रांती घडत असताना प्रत्यक्ष सेवा आणि ग्राहक समाधान यामध्ये मोठी दरी निर्माण झाल्याचे चित्र निर्माण झाले आहे. महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून स्मार्ट मीटर, ऑनलाईन बिलिंग, मोबाईल ॲप, डिजिटल पेमेंट, आणि आता थकबाकीवर स्वयंचलित वीज बंद करण्यासारखी अत्याधुनिक प्रणाली लागू करण्यात आली आहे. मात्र या सर्व हायटेक बदलांनंतरही वीज ग्राहक यांची घुसमट कायम असल्याचे वास्तव आहे.**

महावितरणचे कर्मचारी हे या व्यवस्थेचे कणा मानले जातात. दिवस-रात्र, पाऊस-वादळ, उन्हाळ्याची तीव्रता कोणत्याही परिस्थितीत वीज पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी ते सतत काम करत असतात. ट्रान्सफॉर्मर जळणे, लाईन फॉल्ट, तार तुटणे अशा घटनांनंतर त्वरित दुरुस्ती करण्यासाठी जीव धोक्यात घालून काम केले जाते. मात्र वाढता भार, अपुरी यंत्रणा, आणि काही ठिकाणी मनुष्यबळाची कमतरता यामुळे या प्रयत्नांना अपेक्षित यश मिळत नाही. परिणामी, सेवा खंडित राहते आणि ग्राहकांचा रोष वाढतो. या रोषास काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना सामोरे जावे लागते. ग्राहकांच्या दृष्टीने पाहिले असता, वीज ही आजच्या काळातील मूलभूत गरज बनली आहे. शेती, उद्योग, शिक्षण, घरगुती वापर सर्वच क्षेत्रे वीजेवर अवलंबून आहेत. तरीही वारंवार होणारे लोडशेडिंग, कमी-जास्त व्होल्टेज, आणि अचानक खंडित होणारा पुरवठा या समस्या अजूनही कायम आहेत. ग्रामीण भागात तर ठराविक वेळा वीज बंद राहणे ही रोजची बाब बनली आहे. त्यामुळे "बिल भरतो, पण सेवा मिळत नाही" अशी भावना निर्माण झाली आहे. या सर्व पार्श्वभूमीवर वीज बिल हा सर्वात संवेदनशील मुद्दा ठरत आहे. ग्राहकांच्या हातात येणाऱ्या बिलामध्ये विविध प्रकारचे आकार समाविष्ट असतात. साध्या ग्राहकाला या सर्व घटकांचा अर्थ समजणे कठीण जाते. वापर मर्यादित असतानाही बिल वाढलेले दिसते, यामुळे शंका आणि असंतोष वाढतो.



### वीज बिलातील विविध आकार

स्थिर आकार, वीज आकार, वहन कर, इंधन समायोजन आकार, वीज शुल्क, वीज विक्री कर, इतर आकार, व्याज इतके विविध प्रकारचे आकार आकारले जात असतील, तर त्यानुसार सेवा मिळणे आवश्यक आहे. मात्र प्रत्यक्षात वारंवार खंडित होणारी वीज आणि लोडशेडिंगमुळे या आकारांवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

### स्मार्ट मीटर... स्मार्ट वसुली

महावितरणने स्मार्ट आणि प्रीपेड मीटरच्या माध्यमातून वसुली अधिक कडक केली आहे. नव्याने बसवलेल्या मीटरमुळे बिल थकित राहिल्यास आता वीजपुरवठा आपोआप बंद होण्याची प्रणाली लागू झाली आहे. पूर्वी कर्मचारी प्रत्यक्ष जाऊन कनेक्शन तोडत असत, परंतु आता हे काम पूर्णपणे डिजिटल झाले आहे. नियंत्रण कक्षातून काही क्षणांत कनेक्शन डिस्कनेक्ट केले जाते आणि बिल भरल्यानंतर पुन्हा री-कनेक्ट करण्याची सुविधा उपलब्ध आहे. ही प्रणाली महसूल नियंत्रणाच्या दृष्टीने प्रभावी असली तरी ग्राहकांसाठी ती तितकीच कठोर ठरत आहे. अनेक वेळा बिलातील त्रुटी, मीटर रीडिंगमधील फरक किंवा आर्थिक अडचणीमुळे बिल थकित राहते. अशा परिस्थितीत अचानक वीज बंद झाल्याने ग्राहकांना मोठा त्रास सहन करावा लागतो. विशेषतः ग्रामीण भागात या तंत्रज्ञानाबाबत जागरूकतेचा अभाव असल्याने गोंधळ निर्माण होतो.

### वीज चोरीवर नियंत्रण कोणाचे ?

वीज चोरी ही अजूनही मोठी समस्या आहे. अनधिकृत वीज वापरामुळे वितरण यंत्रणेवर ताण येतो आणि त्याचा परिणाम ट्रान्सफॉर्मर जळणे, लाईन फॉल्ट वाढणे यामध्ये दिसून येतो. याचा फटका मात्र प्रामाणिक ग्राहकांना बसतो, कारण त्यांनाच अधिक बिल भरावे लागते आणि सेवा देखील अपुरी मिळते. त्यामुळे यावर नियंत्रण कोणाचे हा प्रश्न निर्माण झाला आहे.

### महावितरणसमोर मोठे आव्हान

महावितरणची प्रणाली हायटेक झाली असली तरी ग्राहकांचा अनुभव अजूनही समाधानकारक नाही. कर्मचारी पोटतिडकीने काम करत असले तरीही ग्राहक मात्र असंतुष्ट आहेत, आणि व्यवस्थेवर ताण वाढत आहे. बिलातील वाढते आकार, लोडशेडिंग, आणि स्वयंचलित वीज बंद करण्यासारखी कडक प्रणाली यामुळे परिस्थिती अधिक संवेदनशील बनली आहे. या सर्व परिस्थितीचे महावितरणसमोर मोठे आव्हान उभे आहे. तंत्रज्ञानाबरोबरच सेवा दर्जा सुधारणे, ग्राहकांचा विश्वास मिळवणे, आणि 'आकार जितका, सेवा तितकी चांगली' हा समतोल साधणे ही काळाची गरज ठरत आहे.

# कळंबमध्ये 'राष्ट्रचिंतन अभियान' अंतर्गत आज विशेष व्याख्यान

आरंभ मराठी । कळंब

कळंब येथील विद्याभवन हायस्कूलच्या सभागृहात हिन्दराष्ट्र ऑर्गनायजेशनच्या वतीने 'राष्ट्रचिंतन अभियान' अंतर्गत आज (दि.७) विशेष चर्चा सत्राचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम दुपारी ४ ते ६ या वेळेत पार पडणार आहे. या चर्चासत्रामध्ये कृषी, आरोग्य आणि शिक्षण या महत्त्वाच्या विषयांवर सखोल मार्गदर्शन व विचारमंथन होणार आहे. कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून महर्षी गज अरविंद उपस्थित राहणार आहेत. तसेच कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी धाराशिव जिल्हा ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष ह.भ.प. महादेव महाराज अडसूळ हे असणार आहेत. या उपक्रमाच्या माध्यमातून समाजातील विविध घटकांना दिशा देणारे विचार मांडले जाणार असून नागरिकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. हिन्द राष्ट्र संघाच्या महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष राधाताई सपकाळ व व्यवस्थापक अंकुश कसबे यांनी कळंब शहर व तालुक्यातील नागरिकांना मोठ्या संख्येने उपस्थित राहून चर्चासत्रात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

# वाशी तालुका सेवादल काँग्रेस अध्यक्षपदी बाळासाहेब बनसोडे यांची निवड

आरंभ मराठी । वाशी

संघटन सृजन अभियानांतर्गत महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या मार्गदर्शनाखाली विविध जिल्ह्यांमध्ये घेतलेल्या आढाव्यानंतर सेवादल काँग्रेसच्या ब्लॉक स्तरावरील नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या आहेत. प्रांताध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या मान्यतेने वाशी येथील बाळासाहेब दासु बनसोडे यांची वाशी तालुका सेवादल काँग्रेस अध्यक्षपदी निवड करण्यात आली.या निवडीमुळे तालुक्यातील काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. मल्लिकार्जुन खरगे आणि राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली पक्षाचे विचार तळागाळापर्यंत पोहोचविणे व संघटन बळकट करण्याची जबाबदारी बनसोडे यांच्यावर सोपविण्यात आली आहे. त्यांच्या निवडीबद्दल विविध स्तरांतून अभिनंदन होत असून, वाशी तालुक्यात काँग्रेस संघटना अधिक सक्षम करण्यासाठी ते प्रभावी काम करतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# वडगाव काटी ग्रामपंचायत भ्रष्टाचार प्रकरणी महिला सदस्य निलाबाई डाके यांचे आमरण उपोषण

आरंभ मराठी । तुळजापूर

तुळजापूर तालुक्यातील वडगाव काटी येथील ग्रामपंचायतीत झालेल्या कथित भ्रष्टाचाराच्या चौकशीसाठी ग्रामपंचायत सदस्य निलाबाई काशिनाथ डाके यांनी पंचायत समिती कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे. या उपोषणाला अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघटनेचा पाठिंबा मिळाला असून दोषींवर तात्काळ कारवाई करण्याची जोरदार मागणी करण्यात येत आहे. वडगाव काटी ग्रामपंचायतीत मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा आरोप करत उपोषणकर्त्यांनी प्रशासनाकडे सखोल चौकशीची मागणी केली आहे. ग्रामपंचायतीच्या विविध कामांमध्ये अनियमितता झाल्याचा संशय व्यक्त करण्यात आला असून संबंधितांवर कठोर कारवाईची मागणी करण्यात येत आहे. उपोषणकर्त्यांनी केलेल्या प्रमुख मागण्यांमध्ये ग्रामपंचायतीचे सर्व अभिलेख साक्षांकित प्रतींसह तात्काळ उपलब्ध करून देणे, सर्व कामांची आर्थिक व तांत्रिक चौकशी करणे, निधी




गैरव्यवहार प्रकरणी गुन्हे दाखल करणे, चौकशी पूर्ण होईपर्यंत संबंधित अधिकारी व पदाधिकाऱ्यांना पदावरून दूर करणे, दिशाभूल करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करणे तसेच सरपंच, ग्रामसेवक व संबंधितांवर कठोर कारवाई करणे यांचा समावेश आहे. निलाबाई डाके यांनी विभागीय आयुक्तांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, ग्रामस्थांनी दिलेल्या प्रतिनिधित्वाच्या जबाबदारीतून ग्रामपंचायतीच्या कामकाजात पारदर्शकता आणण्याचा प्रयत्न केला. यासाठी मंजूर निधी, खर्च तपशील, ठराव पुस्तके, बिल व्हाउचर, मोजमाप पुस्तके व इतर अभिलेखांच्या प्रती मिळवण्यासाठी अनेक वेळा अर्ज व तक्रारी सादर केल्या. मात्र संबंधित सरपंच, ग्रामसेवक, विस्तार अधिकारी आणि पंचायत समिती प्रशासनाकडून माहिती देण्यात टाळाटाळ करण्यात आली. नोटीस देऊनही त्याची प्रभावी अंमलबजावणी झाली नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

# प्रधानमंत्री इंटरशिप योजनेचा तिसरा टप्पा सुरू

## युवकांना अर्ज करण्याचेआवाहन

आरंभ मराठी । धाराशिव

देशातील युवकांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळावा आणि उद्योगविश्वाशी त्यांचा संपर्क वाढावा यासाठी भारत सरकारने प्रधानमंत्री इंटरशिप योजनेचा तिसरा टप्पा सुरू केला आहे. या योजनेअंतर्गत निवड झालेल्या उमेदवारांना देशातील आघाडीच्या कंपन्या व आस्थापनांमध्ये ६ ते ९ महिन्यांच्या कालावधीसाठी इंटर्नशिपची संधी उपलब्ध होणार आहे. या योजनेचे विशेष आकर्षण म्हणजे उमेदवारांना दरमहा ९ हजार रुपये विद्यावेतन दिले जाणार असून, इंटरशिप यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर ६ हजार रुपये एकरकमी अनुदानही प्रदान केले जाईल. याशिवाय प्रत्येक प्रशिक्षणार्थ्याला भारत सरकारतर्फे प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना आणि प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना अंतर्गत विमा संरक्षण देण्यात येणार आहे. इच्छुक उमेदवारांनी www.pminternship.mca.gov.in या संकेतस्थळावर जाऊन प्रथम नोंदणी करून आपला प्रोफाईल तयार करावा.त्यानंतर विविध क्षेत्रांतील उपलब्ध इंटरशिपसाठी अर्ज करता येणार आहे. या योजनेसाठी पात्रतेच्या अटी निश्चित करण्यात आल्या असून, उमेदवार किमान १० वी,१२ वी, पॉलिटेक्निक,डिप्लोमा किंवा पदवीधर असणे आवश्यक आहे. तसेच वय १८ ते २५ वर्षांच्या दरम्यान असावे.उमेदवाराच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न १२ लाख रुपयांपेक्षा जास्त नसावे आणि कुटुंबातील कोणताही सदस्य सरकारी सेवेत नसावा.यापूर्वी संबंधित उमेदवाराने कोणतीही इंटरशिप,ॲप्रेंटिसशिप किंवा कौशल्य प्रशिक्षण घेतलेले नसावे,ही अटही लागू आहे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त पात्र उमेदवारांनी या संधीचा लाभ घ्यावा आणि दिलेल्या संकेतस्थळावरून आपली नोंदणी करावी असे आवाहन सहायक आयुक्त,जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र यांनी केले आहे.

# नरसापूर घटनेच्या निषेधार्थ भूममध्ये संताप; आरोपीवर कठोर कारवाई करण्याची मागणी

आरंभ मराठी । भूम

पुणे येथील नरसापूर परिसरात महाराष्ट्र दिनी घडलेल्या अल्पवयीन बालिकेवरील अत्याचार व निघृण हत्येच्या घटनेच्या निषेधार्थ जनशक्ती नगर विकास आघाडी, भूम यांच्या वतीने तीव्र संताप व्यक्त करण्यात आला. या अमानुष घटनेचा निषेध नोंदवत आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी प्रशासनाला निवेदन देऊन आरोपीवर कठोर कारवाई करून पीडितेला न्याय देण्याची मागणी केली आहे. सदर निवेदन उपविभागीय अधिकारी, भूम यांच्या मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठविण्यात आले. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, ही घटना अत्यंत संतापजनक असून संपूर्ण समाजमन हेलावून टाकणारी आहे. अशा प्रकारच्या घटनांमुळे समाजात भीती व असुरक्षिततेचे वातावरण निर्माण होत असल्याची खंत व्यक्त करण्यात आली. जनशक्ती नगर विकास आघाडीने केलेल्या प्रमुख मागण्यांमध्ये या प्रकरणाचा निष्पक्ष व जलद गतीने तपास करणे, कठोर कायद्यांनुसार गुन्हा दाखल करणे, प्रकरणाची सुनावणी जलदगती न्यायालयात चालविणे तसेच पीडित कुटुंबाला आर्थिक मदत देणे यांचा समावेश आहे. यावेळी निवेदन देताना उपनगराध्यक्ष लक्ष्मी साठे, बांधकाम सभापती अनिल शेंडगे, नगरसेवक सुनीता वीर, शमशाद मुजावर, नुरजहां मनीयार, चंद्रकला पवार, विठ्ठल बागडे, पाणी पुरवठा सभापती नवनाथ रोकडे, नियोजन सभापती रामराजे कुंभार, नगरसेवक चंद्रमणी गायकवाड तसेच अमोल वीर, प्रदीप साठे, इम्रान मुजावर, राहुल पवार आणि महेंद्र गायकवाड उपस्थित होते.

आरंभ मराठी | उष्णतेच्या झळा, उत्पादन घट आणि बाजारातील चढ-उतारामुळे आंब्याचे दर गगनाला

# उन्हामुळे भाजीपाल्यांचे दर गगनाला, फळांचा राजा आंबाही खातोय भाव


आरंभ मराठी । पारा

बाजारात दररोज भाज्यांचे भाव किलोने मोजले जात असताना, दुसरीकडे "फळांचा राजा" म्हणून ओळखला जाणारा आंबा मात्र यंदा ग्राहकांच्या खिशाला चांगलाच चटका देताना दिसत आहे. वाढती उष्णता, अवकाळी पावसाचा फटका, उत्पादनातील घट आणि वाढलेला वाहतूक खर्च यामुळे आंब्याचे दर विक्रमी पातळीवर पोहोचले आहेत. त्यामुळे "भाज्यांना तराजूत भाव तर फळांचा राजा खातोय भाव!" अशीच परिस्थिती सध्या बाजारात निर्माण झाली आहे. यंदाच्या हंगामात सुरुवातीपासूनच हवामानाचा मोठा परिणाम आंबा उत्पादनावर झाला. मोहोर येण्याच्या काळात तापमानात झालेली अचानक वाढ आणि काही भागात पडलेल्या अवकाळी पावसामुळे अनेक बागांचे नुकसान झाले. परिणामी बाजारात आवक कमी झाली आणि मागणी वाढल्याने दर झपाट्याने वाढले. सामान्य ग्राहकांना एक डझन दर्जेदार आंबे खरेदी करण्यासाठी चारशे ते पाचशे रुपये मोजावे लागत आहेत. धाराशिवसह मराठवाड्यातील बाजारपेठांमध्ये केशर, हापूस, पायरी आणि बदाम या जातींच्या आंब्यांना मोठी मागणी आहे. मात्र कमी उत्पादनामुळे व्यापाऱ्यांनाही माल टिकवून ठेवणे कठीण जात आहे. किरकोळ बाजारात चांगल्या प्रतीच्या आंब्यांचे दर प्रतिकिलो १५० ते ४०० रुपयांपर्यंत पोहोचले आहेत. दुसरीकडे टोमॅटो, कांदा, बटाटा यांसारख्या भाज्यांचे दर तुलनेने स्थिर असल्याने ग्राहक भाज्यांकडे वळताना दिसत आहेत.उन्हाळा वाढत असताना फळांची मागणी नैसर्गिकरित्या वाढते. त्यातच आंबा हा प्रतिष्ठेचा आणि चवीचा विषय असल्याने अनेक कुटुंबे महाग असूनही आंबा खरेदी करण्यास प्राधान्य देत आहेत. मात्र मध्यमवर्गीय आणि सर्वसामान्य नागरिकांसाठी यंदाचा आंबा "चव घेण्यापुरताच" मर्यादित राहील, अशी प्रतिक्रिया ग्राहकांमधून व्यक्त होत आहे. व्यापाऱ्यांच्या मते, पुढील काही आठवड्यांत बाजारातील आवक वाढल्यास दरात काही प्रमाणात घट होऊ शकते. मात्र हवामानातील अनिश्चितता कायम राहिल्यास यंदा आंब्याचे दर संपूर्ण हंगामभर तेजीत राहण्याची शक्यता नाकारता येत नाही.



### आंब्याचे सध्याचे बाजारभाव

| | |
|---|---|
| केशर - | २०० ते २५० प्रतिकिलो |
| हापूस - | १५ आंब्यांची पेटी सुमारे १,३०० |
| बदाम - | १०० ते २०० प्रतिकिलो |
| पायरी - | १५० ते ४०० प्रतिकिलो |



### भाज्यांचे बाजारभाव (प्रति किलो)

| भाजी | दर |
|---|---|
| मिरची - | ४० ते ८० |
| कोथिंबीर - | ५ ते २० |
| वांगे - | १५ ते ६० |
| फ्लॉवर - | ३० ते ८० |
| शेवगा - | २० ते ७० |
| टोमॅटो - | १५ ते ८० |
| कोबी - | ५ ते ३० |
| गवार - | ५ ते ३० |

# जळकोट येथे मनरेगा कामांतील भ्रष्टाचाराविरोधात साखळी उपोषण; चौकशीची मागणी




आरंभ मराठी । नळदुर्ग

तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथे मनरेगा अंतर्गत शेतरस्ते मजबुतीकरणाच्या कामात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचा आरोप करत ग्रामस्थांनी ४ मेपासून साखळी उपोषण सुरू केले आहे. रोहित राम कदम आणि चेतन राजेंद्र सोनटक्के यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात येत असून प्रशासनाच्या दिरंगाईविरोधात शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. जळकोट शिवारातील विविध शेतरस्त्यांच्या कामांमध्ये अनियमितता झाल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. मनरेगा अंतर्गत मंजूर झालेल्या कामांमध्ये प्रत्यक्षात काम न करता केवळ कागदोपत्री मजबुतीकरण दाखवून निधीचा अपहार झाल्याचा दावा तक्रारदारांनी केला आहे. यापूर्वी २७ मार्च २०२६ रोजी तक्रार देऊनही कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने अखेर ग्रामस्थांनी उपोषणाचा मार्ग अवलंबला.तक्रारदारांनी कोळनूर पांढरी शिव ते आडवाट रस्ता (२ किमी), बोरमण तांडा ते जळकोटवाडी (नळ) रस्ता, मुर्टा रस्ता ते वाड्यावरची आई शिवरस्ता तसेच जळकोट हंगरगा रोड ते नारायण पटणे यांच्या शेतापर्यंतचा रस्ता (२ किमी) या कामांमध्ये भ्रष्टाचार झाल्याचा आरोप केला आहे.या संदर्भातील निवेदन जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा विशेष शाखा धाराशिव आणि नळदुर्ग पोलीस ठाणे यांना देण्यात आले आहे. संबंधित कामांची पारदर्शक चौकशी करून दोषींवर कारवाई होईपर्यंत उपोषण सुरू ठेवण्याचा निर्धार आंदोलकांनी व्यक्त केला आहे. तसेच प्रशासनाने वेळेत दखल न घेतल्यास पुढील टप्प्यात जलसमाधी आंदोलन करण्याचा इशाराही शेतकऱ्यांनी दिला आहे.

दैनिक आरंभ मराठी